SAMPLE CONTENT



Perfect

# मराठी कुमारभारती

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

मातीशी असलेला ऋणानुबंध
आपल्या काळ्या आईशी (मातीशी) कृतज्ञ असणाऱ्या भूमिपुत्राची व्यथा.... **मातीची सावली**

इयत्ता
## नववी
(मराठी माध्यम)


सौ. अनिता म्हात्रे
M.A. B.Ed.

प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.



Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित

# PERFECT
# मराठी कुमारभारती
## इयत्ता नववी

### ठळक वैशिष्ट्ये

- इयत्ता १० वीचे अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूप केंद्रस्थानी ठेवून रचना.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- पाठांचे परिच्छेदांमध्ये व आवश्यक तेथे कवितांचे पद्यांशांमध्ये विभाजन.
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा समर्पक उत्तरांसहित समावेश.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- कवितेवर आधारित रसग्रहण कृतींचा समावेश.
- व्याकरणाच्या अधिकाधिक सरावाकरता प्रत्येक पाठ, कविता व स्थूलवाचनाच्या अंती भाषाभ्यास विभाग अंतर्भूत.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- स्वयंअध्ययनासाठी परिपूर्ण मार्गदर्शक.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 5412
TEID: 2418

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

नववीचं वर्ष म्हणजे दहावीचा पाया असतो, त्यामुळे नववीला वेगळं महत्त्व आहे. या वर्गाकरता शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनाधारित अभ्यासक्रम भाषेची रुची वाढवणारा व अभ्यासाची कला शिकवणारा आहे. 'घोका आणि ओका' या पाठांतर पद्धतीपेक्षा वेगळा असा हा अभ्यासक्रम भाषिक कौशल्यांचा विकास करणारा आहे, यामुळे भाषाज्ञान हे फक्त प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता आकलनशक्ती व सर्जनशीलता या क्षमतांचा विकास करणारे ठरेल. या अभ्यासक्रमाशी ओळख करून देण्यासाठी आणि हसतखेळत भाषा आत्मसात करण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे Perfect मराठी कुमारभारती इयत्ता नववी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

इयत्ता दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाला आधारभूत मानून या पुस्तकाची निर्मिती केली आहे. दहावीच्या अद्ययावत प्रारूपाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा व त्या दृष्टीने अध्ययन करणे सोपे व्हावे हा यामागील मूळ उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन यांसारखी भाषिक कौशल्ये विकसित करणे तसेच वैचारिकता व कल्पनाशक्ती विकसित करणे ही या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार कृतींची मांडणी हे आमच्या प्रकाशनाच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. पुस्तकाची सहज, सुलभ, सोपी भाषा ही मुलांना भाषेत जाणवणारी क्लिष्टता दूर करून त्यांच्यामध्ये विषयाची आवड निर्माण करण्यास सक्षम आहे.

परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करता अधिकाधिक सरावासाठी मुबलक कृतींची सोप्या शब्दांत रचना केली आहे. व्याकरण हा भाषेचा आत्मा असतो हे जाणून व्याकरणाच्या सरावावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना व्याकरणावर पर्यायाने भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे होईल. हे पुस्तक मुलांची परीक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गरज भागवण्यास समर्थ आहेच शिवाय ते विद्यार्थ्यांमध्ये भाषेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन निर्माण करणारेही आहे.

या पुस्तकाचे अंतरंग अधिक सुंदर आणि ज्ञानाशयाने समृद्ध असून एका दृष्टिक्षेपात ते जाणता यावे याकरता पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये पुढे सोदाहरण दर्शवली आहेत.

या पुस्तकात प्रत्येक अभ्यासघटकाचा सर्वांगाने परामर्श घेतला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक एक परिपूर्ण मार्गदर्शक ठरेल अशी आम्हांला खात्री वाटते. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर! चला ... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोतच.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय **support@lazybone.in** या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** द्वितीय

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'Marathi Kumarbharati; Second reprint 2019' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# ठळक वैशिष्ट्ये

**पाठाची पार्श्वभूमी/ कवितेचा आशय**

या विभागात पाठाचा/ कवितेचा आशय चटकन कळावा याकरता पाठाची/ कवितेची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात देण्यात आली आहे.

**कवितेचा भावार्थ**

कविता समजण्यास सोपी व्हावी याकरता संपूर्ण कवितेचा भावार्थ सोप्या भाषेत देण्यात आला आहे.

**शब्दार्थ/वाक्प्रचार व त्यांचे अर्थ**

पाठ उत्तमप्रकारे समजण्याकरता त्यातील अवघड शब्दांचे व वाक्प्रचारांचे सोप्या मराठीत अर्थ देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीकरता वर्णमालेच्या क्रमानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे.

**टिपा**

पाठ चांगल्याप्रकारे समजण्याकरता पाठात आलेल्या अवघड संकल्पना स्पष्ट करणाऱ्या टिपा वर्णमालेच्या क्रमानुसार देण्यात आल्या आहेत.

**पाठाचे परिच्छेदांमध्ये / आवश्यक तेथे कवितांचे पद्यांशात विभाजन**

पाठ / कविता चांगल्याप्रकारे समजावे याकरता त्यांचे बोर्ड कृतिपत्रिकेच्या आराखड्यानुसार योग्य असे परिच्छेद / पद्यांश पाडण्यात आले असून त्यावर आधारित वेगवेगळ्या कृती भरभरून देण्यात आल्या आहेत.

**पाठाधारित कृती/कवितेवर आधारित कृती**

या विभागात संपूर्ण पाठावर/ कवितेवर आधारित असलेल्या कृतींचा समावेश करण्यात आला आहे. या कृतींतील उत्तरे संपूर्ण पाठाचा आढावा घेऊन लिहिली गेली आहेत.

**भाषाभ्यासावर आधारित कृती**

भाषाभ्यासाच्या अधिक सरावाकरता प्रत्येक पाठाच्या शेवटी भाषाभ्यासावर आधारित कृती देण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये व्याकरण घटकांवर आधारित व भाषिक घटकांवर आधारित कृतींचा समावेश करण्यात आला आहे.

**अपठित गद्य परिच्छेद**

अपठित गद्याच्या उत्तम सरावाकरता विविध प्रकारच्या कृतींसह भरपूर अपठित उतारे देण्यात आले आहेत.

**व्याकरण विभाग**

व्याकरण घटकांच्या सखोल अभ्यासाकरता व अधिकाधिक सरावाकरता स्वतंत्र व्याकरण विभाग समाविष्ट करण्यात आला आहे. 'शब्दांच्या जाती, शब्दसिद्धी, अलंकार, रसविचार, वृत्तविचार, विरामचिन्हे, लेखननियम, वाक्यांचे प्रकार आणि वाक्य रूपांतर, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, म्हणी, अनुवादलेखन' या व्याकरण घटकांचा उदाहरणांसह आढावा घेण्यात आला आहे.

**उपयोजित लेखन**

उपयोजित लेखनाच्या अधिकाधिक सरावाकरता पत्रलेखन, सारांशलेखन, बोलीभाषेचा परिचय, कथालेखन, जाहिरातलेखन, मुलाखत, संवादलेखन, वृत्तान्तलेखन, लेखनकौशल्य इत्यादी घटकांवर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा यात समावेश करण्यात आला आहे.

**अंतर्गत मूल्यमापन**

अंतर्गत मूल्यमापनाच्या २० गुणांचे विभाजन, विविध कौशल्यांकरता निर्धारित केलेली गुणदान योजना आणि त्यासंदर्भातील उपयुक्त मार्गदर्शन म्हणून मराठी विषयाच्या तोंडी परीक्षेसंदर्भात अधिक माहिती या भागात समाविष्ट करण्यात आली आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठ / कविता | | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | वंद्य 'वन्दे मातरम्' (गीत) | | ग. दि. माडगूळकर | १ |
| २. | संतवाणी | (अ) जैसा वृक्ष नेणे | संत नामदेव | ४ |
| | | (आ) धरिला पंढरीचा चोर | संत जनाबाई | १२ |
| ३. | कीर्ती कठीयाचा दृष्टान्त | | म्हाइंभट | १८ |
| ४. | नात्यांची घट्ट वीण | | मीरा शिंदे | २३ |
| ५ | एक होती समई | | उत्तम कांबळे | ३१ |
| • | हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन) | | मधुकर धर्मापुरीकर | ४० |
| ६. | या झोपडीत माझ्या (कविता) | | राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | ४५ |
| ७. | दुपार | | राजीव बर्वे | ५३ |
| ८. | अभियंत्यांचे दैवत – डॉ. विश्वेश्वरय्या | | डॉ. यशवंत पाटणे | ६६ |
| ९. | मी वाचवतोय (कविता) | | सतीश काळसेकर | ७८ |
| १०. | यंत्रांनी केलं बंड | | भालबा केळकर | ९० |
| • | इंग्लंडचा हिवाळा (स्थूलवाचन) | | इरावती कर्वे | १०२ |
| ११. | मातीची सावली | | स्टॅन्ली गोनसाल्विस | १०८ |
| १२. | महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया (पोवाडा) | | अण्णा भाऊ साठे | १२४ |
| १३. | थोडं 'आ' भारनियमन करूया | | मंगला गोडबोले | १३६ |
| १४. | आदर्शवादी मुळगावकर | | गोविंद तळवलकर | १४८ |
| १५. | निरोप (कविता) | | पद्मा गोळे | १५९ |
| • | 'बिग ५' च्या सहवासात (स्थूलवाचन) | | जयप्रकाश प्रधान | १६९ |
| १६. | वनवासी (कविता) | | तुकाराम धांडे | १७५ |
| १७. | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ | | बाळ ज. पंडित | १८५ |
| १८. | हसरे दु:ख | | भा. द. खेर | १९५ |
| १९. | प्रीतम | | माधुरी शानभाग | २०९ |
| २०. | आपुले जगणे... आपुली ओळख ! (कविता) | | संदीप खरे | २१९ |
| • | विश्वकोश (स्थूलवाचन) | | | २३० |
| २१. | अपठित गद्य आकलन | | | २३५ |
| २२. | मैत्री तंत्रज्ञानाशी | | | २४० |


Sample Content

| क्र. | पाठ / कविता | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | | |
| १. | शब्दांच्या जाती | | २४१ - २६३ |
| २. | शब्दसिद्धी (उपसर्गघटित, प्रत्ययघटित शब्द) | | |
| ३. | अलंकार | | |
| ४. | रसविचार | | |
| ५. | वृत्तविचार | | |
| ६. | विरामचिन्हे | | |
| ७. | लेखननियम | | |
| ८. | वाक्यांचे प्रकार आणि वाक्यरूपांतर | | |
| ९. | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | | |
| १०. | म्हणी | | |
| ११. | अनुवादलेखन | | |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १. | पत्रलेखन | | २६४ |
| २. | सारांशलेखन | | २७५ |
| ३. | बोलीभाषांचा परिचय | | २७८ |
| ४. | कथालेखन | | २८० |
| ५. | जाहिरातलेखन | | २८५ |
| ६. | मुलाखत | | २९० |
| ७. | संवादलेखन | | २९३ |
| ८. | वृत्तान्तलेखन | | २९६ |
| ९. | लेखनकौशल्य | | २९९ |
| • | अंतर्गत मूल्यमापन | | ३१० |


**[टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

## कुमारभारती गुणविभागणी

**लेखी परीक्षा**

**घटकनिहाय गुणविभागणी**

| अनु. क्र | घटक | गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | १८ गुण | |
| २ | पद्य | १६ गुण | ४ गुण |
| ३ | स्थूलवाचन | ०६ गुण | ३ गुण |
| ४ | भाषाभ्यास | १६ गुण | ५/६ गुण |
| ५ | उपयोजित लेखन | २४ गुण | ३३ गुण |
| | एकूण गुण | ८० गुण | ४५/४६ गुण |

**अंतर्गत मूल्यमापन – २० गुण**

| | | |
|---|---|---|
| अ. | श्रवण कौशल्य | ०५ गुण |
| आ. | भाषण कौशल्य | ०५ गुण |
| इ. | स्वाध्याय | १० गुण |

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

[**टीप:** वरील माहिती दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित आहे.]

Sample Content

व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन विभागांत अधिक गुण मिळवायचे असल्यास **“मराठी व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन”** या पुस्तकाद्वारे सराव करा. या पुस्तकाच्या अधिक माहितीसाठी दिलेला Q. R. Code स्कॅन करा.

Sample Content

# ४ नात्यांची घट्ट वीण

– मीरा शिंदे

## पाठाची पार्श्वभूमी

प्रस्तुत पाठ 'आवाम' २०१० या मासिकातून घेतला आहे. माणसे ही नात्यांमुळे एकमेकांना जोडली जातात. नात्यांचा हा प्रवास जन्मापासून अखेरपर्यंत सतत चालूच राहतो. लेखिकेने या पाठात विविध नात्यांचे सहज व प्रभावी वर्णन केले आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अनादी | अनंत, अथांग |
| अपरिहार्य | अटळ |
| अभिनव | नवीन |
| अभिन्न | वेगळा नसलेला |
| असह्य | सहन करण्यास अशक्य |
| अहंगंड | अहंकार |
| उपरणं | अंगावर घेण्याचे वस्त्र |
| उरी | हृदयी |
| कसोटी | परीक्षा |
| कुंचला | चित्र रंगवताना वापरण्याचा ब्रश |
| खडतर | अवघड, अडथळ्यांचे |
| गूढ | रहस्यमय |
| घडवणे | येथे अर्थ – संस्कार करणे |
| जवळीक | आपुलकी |
| तरल | नाजूक, हळुवार |
| निकोप | निरोगी, निर्मळ |
| निखळ | निर्मळ |
| निखळणे | गळून पडणे |
| निर्णायक | निर्णय करणारा, फैसला करणारा |
| निर्विवाद | वाद न होण्याजोगे |
| बहुरंगी | विविध रंगांचे |
| भवसागर | संसार , विश्व |
| भेदाभेद | भेदभाव |
| भेदून | आरपार जाऊन |
| लेवून | पांघरून, परिधान करून, घालून |
| वल्हं | नाव चालवण्याचे लाकडी साधन, नौकादंड |
| वात्सल्य | प्रेम, माया |
| वार्धक्य | म्हातारपण |
| विश्वात्मक | संपूर्ण विश्वाचा समावेश असणारे |
| वीण | गुंफण |
| शाश्वत | कधीही न बदलणारे |
| सेतू | पूल |
| सृजन | नवनिर्मिती |
| स्वकीय | आपले |
| हितचिंतक | आपल्या हिताविषयी काळजी असणारा |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| आनंदाचा मुखवटा धारण करणे. | आनंदी आहोत असे भासवणे. |
| उंबरठा ओलांडणे. | मर्यादा ओलांडणे. |
| कात टाकणे. | जुन्या / वाईट गोष्टींचा त्याग करून नवीन स्वरूप धारण करणे. |
| कानमंत्र देणे. | गुप्त सल्ला, महत्त्वपूर्ण ज्ञान देणे. |
| जीवाची उलघाल होणे. | काळजीने अस्वस्थ होणे. |
| तारेवरची कसरत करणे. | अतिशय अवघड काम करताना तारांबळ उडणे. |
| नवी पालवी फुटणे. | नवीन सुरुवात होणे/ नवा जन्म लाभणे/ नवे स्वरूप प्राप्त होणे. |
| पाठीशी उभे राहणे. | पाठिंबा देणे, सहकार्य करणे. |
| पिकलं पान गळणे. | मृत्यू होणे. |
| पोरके होणे. | अनाथ होणे. |
| मात करणे. | पराभूत करणे. |
| हुरहुर लागणे. | जिवाला चुटपुट लागणे. |

## टिपा

| | |
|---|---|
| गुरुदक्षिणा | विद्याग्रहण संपल्यानंतर शिष्याने गुरूला द्यायची देणगी. |
| छिन्नी | दगडापासून शिल्प घडवताना हातोड्यासोबत वापरले जाणारे अवजार. |
| नाळ | गर्भावस्थेत गर्भ व गर्भाशयातील वार यांना जोडणारा दोरीसारखा अवयव. |
| शेजारधर्म | शेजाऱ्यांसंबंधी वागणुकीची रीत. |
| क्षितिज | पृथ्वी आणि आकाश जिथे एकत्र आले आहेत, असा आभास निर्माण होतो ते ठिकाण. |

Sample Content

## परिच्छेद १

### कृती १ – आकलन

**कृ.१. आकृती पूर्ण करा.**

i. [ ] ← **नात्यांमध्ये दिसणारे भेदाभेद** → [ ]

**उत्तर:** १. स्वकीय २. परकीय

ii. **नाती अशी निर्माण होतात**

[ ] [ ] [ ]

**उत्तर:** १. जन्मापासून २. सहवासातून
३. वातावरणातून

*iii. **नात्याच्या विणीसाठी योजलेली विशेषणे**

[ ] [ ] [ ] [ ]

**उत्तर:** १. नाजूक २. भक्कम
३. मुलायम ४. धारदार
५. बहुरंगी
(**टीप** : विद्यार्थ्यांनी कोणतीही चार विशेषणे लिहावीत.)

*iv. **नात्याच्या विणेची पाठातील वैशिष्ट्ये**

[ ] [ ] [ ] [ ]

**उत्तर:** १. सर्वांभोवती नकळत विणली जाणारी व भेटणाऱ्या प्रत्येक नात्याने अधिकाधिक मजबूत होणारी
२. कधी नात्याला नाव देत स्वकीय होऊन जवळीक साधणारी, तर कधी परक्याप्रमाणे वागणारी
३. रेशमाच्या धाग्यासारखी एकाच वेळी नाजूक, भक्कम, मुलायम व धारदार असलेली
४. बहुरंगी असलेली आणि नात्यांचे एक-एक पदर उलगडणारी

**कृ.२. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**i. जन्माला आलेला प्रत्येक माणूस जन्माबरोबरच किंवा नाळेबरोबरच _______**
अ. 'नातं' नावाची एक भलीमोठी 'माळ' लेऊन येतो.
ब. अनेक नाती जोडून येतो.
क. विविध नात्यांची गुंफण घेऊन येतो.
ड. आयुष्याला अर्थ देणारी नाती घेऊन येतो.

**ii. नाते नामक मोती मग एक सुंदर _______**
अ. माळ गुंफतात.
ब. आयुष्य निर्माण करतात.
क. वीण गुंफत जातात.
ड. आयुष्य देतात.

**उत्तर:** i. 'नातं' नावाची एक भलीमोठी 'माळ' लेऊन येतो.
ii. वीण गुंफत जातात.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १० वरील (ओळ १ ते २०)**
**[जन्माला आलेला ......................**
**...................... जपली जातात ती कायमचीच!]**

### कृती २ – आकलन

**कृ.१. सत्य विधान ओळखून लिहा.**
i. नाती जन्मापासून, सहवासातून व वातावरणातून निर्माण होतात.
ii. सगळी नाती आपल्यालाच निर्माण करावी लागतात.
iii. जन्मामुळे निर्माण झालेली नातीच आयुष्य सुंदर करतात.
iv. आठवणीसह हृदयात जपलेली नाती तकलादू असतात.

**उत्तर:** नाती जन्मापासून, सहवासातून व वातावरणातून निर्माण होतात.

**कृ.२. खालील घटनांचे परिणाम लिहा.**

**i. माणूस कुणाचा तरी मुलगा, कुणाची तरी मुलगी, कुणाचा तरी भाऊ, कुणाची तरी बहीण, कुणाचा तरी नातू म्हणून जन्माला येतो.**
**परिणाम:** माणसाची नात्यांच्या पहिल्या विणीशी ओळख होते.

**ii. आयुष्याच्या प्रवासात नवीन नाती निर्माण होतात.**
**परिणाम:** नात्यांची वीण समृद्ध व सुंदर करून जातात.

**iii. नात्यांची आठवण होते.**
**परिणाम:** कधी डोळ्यांत पाणी जमतं, तर कधी त्या आठवणींसह हृदयात नाती कायमची जपली जातात.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**कृ.१. तुमच्या आयुष्यात नकळत जोडल्या गेलेल्या एखाद्या नात्याबद्दल तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** दरवेळी माणसांशीच नाती जोडली जातात असे नाही. कधी एखाद्या वस्तूशी, तर कधी मुक्या प्राण्यांशी आपली नाती जुळतात. नात्यांमध्ये जाणवणारी ऊब नात्याची वीण घट्ट करते.

मी इयत्ता सातवीत असतानाची गोष्ट. एके दिवशी शाळेतून घरी आल्यावर पाहतो, तर बाबांनी एक गोंडस कुत्र्याचे पिल्लू आणले होते. त्यांना वाटेत थंडीने कुडकुडत असलेले सापडले ते! यापूर्वी मी प्राण्यांशी कधी जवळून खेळलो नव्हतो. पहिल्यांदा त्या पिल्लाला हात लावला, तो

Sample Content

भीतभीतच; पण थोड्याच दिवसांत आमची गट्टी झाली. मी त्याचे नाव बंटी ठेवले. बंटी आणि मी जणू एकमेकांचे जिवलग मित्र झालो. एकत्र खेळणेच नव्हे, तर झोपतानाही तो आपली जागा सोडून आता माझ्याजवळ येऊन झोपतो. त्याला बरे नसले, की मी अस्वस्थ होतो आणि मी आजारी असलो, की तोही शांतपणे माझ्याजवळ बसून राहतो. अशाप्रकारे, दोन जिवलगांसारखे निखळ मैत्रीचे नाते आमच्यात निर्माण झाले आहे.

## परिच्छेद २

### कृती १ – आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i. **जन्मानंतर आई मुलाला अशी घडवते**

**उत्तर:** १. कुंचल्याने हळुवारपणे रंग रेखत

२. छिन्नीचे कठोरपणे घाव घालत

ii. **आपल्याला घडवणाऱ्या आईची विविध रूपे**

**उत्तर:** १. एक गूढ २. उबदार शाल

३. कणखर ढाल

४. बालपणीच्या अंगाईला लागलेली सुंदर चाल

iii. **वडील आपले अश्रू असे लपवतात**

(किंवा)

**उत्तर:** १. जबाबदारीच्या मुखवट्यामागे लपवणे

२. स्वत:च्याच गळ्यातल्या उपरण्याने पुसणे

**कृ.२. चौकट पूर्ण करा.**

**'जग' नावाच्या भवसागरात प्रत्येकालाच हे जपण्याची तारेवरची कसरत करावी लागते.**

**उत्तर:** स्वत:चे माणूसपण

**कृ.३. कोण ते लिहा.**

i. मुलाची जगण्याची वाट कमी खडतर व्हावी यासाठी धडपडणारा

ii. पंख पसरून सातासमुद्रापार झेप घेणारे

**उत्तर:** i. बाप ii. मूल

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १० व ११ वरील (ओळ २१ ते ४३)**
**[प्रत्येक आई मुलाच्या ......................**
**...................... नात्यातून निखळून जातात.]**

### कृती २ – आकलन

**कृ.१. सत्य विधान ओळखून लिहा.**

i. 'बाप' नावाचं 'वल्हं' हातात धरून भवसागर पार केला जातो.

ii. मायेचे आणि वात्सल्याचे पडदे न भेदता, हातात आलेलं मूलं मोठं होऊन उडायला सुरुवात करतं.

iii. आई-वडिलांच्या जिवाची उलघाल मुलांनाच समजते.

iv. नवीन नाती जुळणं ही दोन्ही बाजूंकडून घडणारी प्रक्रिया नसते.

**उत्तर:** 'बाप' नावाचं 'वल्हं' हातात धरून भवसागर पार केला जातो.

**कृ.२. खालील वाक्यांसाठी समान आशयाच्या ओळी पाठातून शोधून लिहा.**

***i. 'पारितोषिक आणि शिक्षा' या तंत्राचा उपयोग आई मुलाला घडवताना करते.**

**उत्तर:** मुलाला घडवताना कधी कुंचल्याच्या हळुवारपणे रंग रेखत, तर कधी छिन्नीचे कठोरपणे घाव घालत तिचे काम चालूच असते.

***ii. जीवनाच्या प्रवासात वडिलांचे मार्गदर्शन घेतले जाते.**

**उत्तर:** मुलाची जगण्याची वाट थोडी कमी खडतर व्हावी, म्हणून 'बाप' नावाचं वल्हं हातात धरून भवसागर पार करण्याचा प्रयत्नही केला जातो.

**iii. आई-वडील एकटे पडूनही मुलांचा नेहमी आधार बनतात.**

**उत्तर:** या विश्वात्मक जगात आपण मात्र पोरके होत जातो हे दु:ख उरी बाळगून, आशीर्वादासाठी उंचावलेला हात तसाच ठेवून मुलांच्या पाठीशी उभं राहण्यापलीकडे आई-वडील काय करू शकतात?

**कृ.३. खालील घटनांचे परिणाम लिहा.**

**i. बाप-मुलात संवाद नामक सेतू बांधला जातो.**

**परिणाम:** संवादातून बापाचं बाप असणं ठळकपणे जाणवत राहतं.

**ii. मूल सातासमुद्रापार जाते.**

**परिणाम:** तुटणाऱ्या नात्याची वेदना आईवडिलांना असह्य होते.

**iii. नाती जुळण्याची प्रक्रिया दोन्हीकडून झाली नाही.**

**परिणाम:** तर अनेक दुवे नात्यातून निसटून जातात.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**कृ.१. वडील आपले अश्रू इतरांपासून का लपवत असतील, असे तुम्हांला वाटते?**

**उत्तर:** एखाद्या कसोटीच्या किंवा दु:खद प्रसंगी घरातील सदस्य अश्रूंवाटे आपल्या भावना व्यक्त करतात; मात्र वडील आपले अश्रू इतरांपासून लपवतात. वडील घराचे आधारस्तंभ असतात. संपूर्ण घराची जबाबदारी त्यांच्यावर असते, त्यामुळे

Sample Content

वडील कमकुवत पडल्यास संपूर्ण घर कोलमडून जाते. वडिलांच्या डोळ्यांत अश्रू पाहून इतरांचाही धीर सुटू शकतो, म्हणूनच संपूर्ण कुटुंबाला आधार देण्यासाठी कठीण प्रसंगात वडिलांना ठाम उभे राहावे लागते. डोळ्यांत अश्रू आले, तरी ते त्यांचे त्यांनाच पुसावे लागतात, तेही सर्वांच्या नकळत! मुलांच्या भल्यासाठी अनेकवेळा वडिलांना कठोर व्हावे लागते आणि या कठोर व जबाबदारीच्या मुखवट्यामागे वडिलांची माया लपली जाते.

## परिच्छेद ३

### कृती १ – आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i.

**शिक्षण घेतल्यानंतर**

शिष्य गुरूला देतो ती गोष्ट → १

गुरू शिष्याला देतो ती गोष्ट → २

**उत्तर:** १. गुरुदक्षिणा  २. कानमंत्र

ii.

**शेजारधर्म**

धागा जुळला असल्यास → १

धागा तुटल्यास → २

**उत्तर:** १. स्नेहाच्या मर्यादा ओलांडतो
२. वैराच्या मर्यादा ओलांडतो

**कृ.२. कोण ते लिहा.**

i. कसोटीच्या काळात परिस्थितीवर कशी मात करायची याचा कानमंत्र देणारा

ii. झोपताना रोज नवी गोष्ट सांगणारी

**उत्तर:** i. गुरू  ii. आजी

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ११ वरील (ओळ ४४ ते ५५)**
**['मैत्री' हे एक असंच ......................**
**...................... मनं दु:खी करून जातात.]**

### कृती २ – आकलन

**कृ.१. चूक की बरोबर ते लिहा.**

i. मैत्रीसारखी भावना खूप सूक्ष्म व तरल असते.

ii. मित्र समोर दिसला, की मैत्रीही दिसतेच.

iii. जगण्यासाठी हितचिंतकाची, मार्गदर्शकाची, गुरूची गरज भासते.

iv. आजीसोबतचे नातेही विसरले जाते.

**उत्तर:** i. बरोबर  ii. चूक
iii. बरोबर  iv. चूक

**कृ.२. 'वृद्धाश्रमाकडे' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर:** आजीला शोधण्यासाठी आता कोणत्या जागेकडे वळावे लागते?

**कृ.३. खालील घटनेचा परिणाम लिहा.**
**मैत्रीचं नातं जपताना दोघांनाही एकाच वेळी एकच स्वप्न पडतं.**

**परिणाम:** तेव्हा ते नातं 'अनादि अनंताचं, नव्या अभिनव सृजनाचं' होतं.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

***कृ.१. तुमच्या सर्वांत जवळच्या मित्राचे / मैत्रिणीचे नाव काय? मैत्रीचं नातं तुम्ही कसे निभवता, ते सविस्तर लिहा.**

**उत्तर:** माझ्या सर्वांत जवळच्या मैत्रिणीचे नाव मेघना. मैत्री या शब्दाचा अर्थ नीटसा कळतही नव्हता तेव्हापासून, म्हणजे इयत्ता पहिलीपासूनची आमची मैत्री. त्या वयात एकत्र खेळणे, डबा खाणे व एकाच बाकावर बाजू-बाजूला बसणे हीच आमच्यासाठी मैत्रीची व्याख्या होती. दोघींपैकी एक शाळेत आली नाही, तर दुसरीला चुकल्यासारखे वाटे. पुढे वयासोबत आमची मैत्रीही दृढ होत गेली.

माझ्या मते, मैत्री निभावणे म्हणजे माझ्या मित्र-मैत्रिणींना त्यांच्या सुख-दु:खात साथ देणे. मैत्री हे एकच नाते असे आहे, जिथे समोरच्या माणसाच्या अपेक्षांचे ओझे आपल्यावर नसते. हे नाते रक्ताच्या नात्यासारखे जन्मामुळे जोडले जात नाही, ते आपल्या आवडी-निवडी, स्वभाव जुळल्यावर जोडले जाते. त्यामुळेच खऱ्या मित्र-मैत्रिणींना एकमेकींची मनं, समस्या, दु:खे ही न सांगताच समजतात. एकवेळ मित्राच्या आनंदात सहभागी होता आले नाही तरी चालेल; पण मदतीची गरज असताना त्याला साथ देणे हीच माझ्यासाठी खरी मैत्री आहे.

**कृ.२. 'मित्र दिसला, तरी मैत्रीचं नातं दिसत नाही' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**उत्तर:** मैत्री ही सूक्ष्म, तरल भावना आहे. ते एक अमूर्त नाते आहे. वस्तूंप्रमाणे मैत्री आपल्या नजरेला दिसत नाही; परंतु असे असले, तरीही आपण तिचे अस्तित्व नाकारू शकत नाही. आपल्या मित्राला संकटसमयी साथ देणे, त्याच्यासोबत तासन्‌तास गप्पा मारणे, प्रत्येक गोष्ट त्याला सांगण्याची इच्छा होणे या सर्वांतूनच मैत्री जाणवत असते. मित्र अगदी रोज सहवासात नसला, कित्येक महिने भेट झाली नसली, तरी त्याच्याविषयी वाटणाऱ्या स्नेहातून, काळजीतून मैत्रीचे नाते जाणवत असते, म्हणजेच मैत्री ही नेमकी दाखवता येत नाही; परंतु तिचे अस्तित्व मात्र जाणवत राहते.

Sample Content

## परिच्छेद ४

### कृती १ – आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**निखळ, निकोप मन समोर येताना या साऱ्यांची कात गळून पडते**

→ ☐ ☐ ☐

**उत्तर:** १. अहंगंड २. मान-अपमान
३. प्रतिष्ठा

**कृ.२. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा.**

i. ________ प्रवास जन्मापासून सुरू होतो.
(आपला, नात्यांचा, मायेचा, माणसांचा)

ii. त्या अभिन्न नात्याला शब्दांचं ________ काय; पण शब्दांचं आभाळही अपुरं पडेल.
(नातंच, लेणंच, सामर्थ्यच, क्षितिजच)

**उत्तर:** i. नात्यांचा ii. क्षितिजच

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ११ वरील (ओळ ५६ ते ६६)**
**[जन्मापासून सुरू झालेला ......................**
**...................... घट्ट पकडून ठेवणारी!]**

### कृती २ – आकलन

**कृ.१. असत्य विधान ओळखा.**

i. तारुण्य संपवून वार्धक्याकडे जाताना मागे पाहणे अपरिहार्य असते.
ii. जन्मापासून सुरू झालेला नात्यांचा हा प्रवास कधीच निर्णायक उंबरठ्यावर येत नाही.
iii. नात्यांची वीण घट्ट पकडून ठेवणारी असते.
iv. पिकलं पान गळणे हा संसाराचा नियम आहे.

**उत्तर:** जन्मापासून सुरू झालेला नात्यांचा हा प्रवास कधीच निर्णायक उंबरठ्यावर येत नाही.

**कृ.२. कारण लिहा.**

**आयुष्याच्या अंतिम टप्प्यावर मागे वळून पाहिल्यावर आपण साऱ्या गोष्टी मान्य करतो.**

**उत्तर:** माणूस जेव्हा वार्धक्याकडे झुकतो, तेव्हा कोणत्याही क्षणी या जगाचा उंबरठा ओलांडून पलीकडच्या जगात जावे लागेल, याची त्याला जाणीव होते. मान-अपमान, प्रतिष्ठा, अहंकार या विकारांपासून मन मुक्त होते व त्यामुळेच या टप्प्यावर आपण साऱ्या गोष्टी मान्य करतो.

***कृ.३. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे फरक स्पष्ट करा.**

| क्र. | तारुण्यातील नात्याचा प्रवास | वार्धक्यातील नात्याचा प्रवास |
|---|---|---|
| | | |

**उत्तर:**

| क्र. | तारुण्यातील नात्याचा प्रवास | वार्धक्यातील नात्याचा प्रवास |
|---|---|---|
| i. | अहंगंड, मान-अपमान, प्रतिष्ठा यांसारख्या भावना नात्यांच्या आड येतात. | अहंकार, मान-अपमान, प्रतिष्ठा इत्यादींचे मुखवटे गळून मन निकोप होते व नव्याने नात्यांकडे पाहू लागते. |
| ii. | तारुण्यात साऱ्या गोष्टी मान्य केल्या जात नाहीत. नात्यांकडे मागे वळून पाहिले जात नाही. | वार्धक्यात मागे वळून पाहणे अपरिहार्य असते. अशावेळी तोपर्यंतचा प्रवास वेगळ्या स्वरूपात डोळ्यांसमोर येतो. आपण साऱ्या गोष्टी मान्य करतो. |

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**कृ.१. वार्धक्यातही माणूस नवीन नात्यांची वीण गुंफू शकतो, असे तुम्हांला वाटते का?**

**उत्तर:** वार्धक्यामध्ये माणूस अधिक हळवा, भावनाप्रधान होतो, त्यामुळे या टप्प्यावर माणूस नक्कीच नवीन नाती जोडू शकतो. वार्धक्यात सर्वसाधारणपणे आयुष्यात येणारे नवे नाते म्हणजे नातवंडांचे नाते. या टप्प्यावर व्यक्ती या दुधावरच्या साईचे-नातवंडांचे जिवापाड कौतुक करून नवीन नात्यांची वीण गुंफतात. नातवंडांवर मायेचा वर्षाव करत त्यांना आशीर्वाद देतात.

याच टप्प्यावर मैत्रीचे नवे नातेही गुंफता येते. आयुष्यभर जबाबदाऱ्यांत गुंतलेला माणूस या टप्प्यावर थोडा निवांत असतो, त्यामुळे नवीन मित्र-मैत्रिणी जोडणे, त्यांच्यासोबत वेळ घालवणे यातून नवीन नात्यांची वीण गुंफली जाते. त्याचबरोबर फावल्या वेळाचा सदुपयोग करण्यासाठी अनेक वृद्ध मंडळी समाजकार्य करताना दिसतात. यातून ते ज्यांना मदत करतात, त्यांच्याशी त्यांचे माणुसकीचे खूप घट्ट नाते विणले जाते.

अशारीतीने, वार्धक्यातही माणसे नवीन नात्यांची वीण गुंफू शकतात.

Sample Content

## पाठाधारित कृती

***कृ.१. वर्गीकरण करा.**

आई, गुरू, वडील, मित्र, भाऊ, आजी, मैत्रीण, बहीण, हितचिंतक, शेजारी

| क्र. | जन्माने प्राप्त नाती | | सान्निध्याने प्राप्त नाती |
|---|---|---|---|
| | | | |

**उत्तर:**

| क्र. | जन्माने प्राप्त नाती | | सान्निध्याने प्राप्त नाती |
|---|---|---|---|
| i. | आई | i. | गुरू |
| ii. | वडील | ii. | मित्र |
| iii. | आजी | iii. | मैत्रीण |
| iv. | भाऊ | iv. | हितचिंतक |
| v. | बहीण | v. | शेजारी |

***कृ.२. 'नातं' या अमूर्त संकल्पनेतून व्यक्त होणाऱ्या विविध भावना लिहा.**

**उत्तर:** मनुष्य हा अनेक नात्यांच्या वीणेत गुंफला गेलेला असतो. 'नातं' ही वस्तू नाही, तर एक प्रेमाची भावना आहे. एकच भावना असली तरी प्रत्येक नात्यासोबत तिला विविध छटा प्राप्त होतात. आईचे प्रेम, आजीचे वात्सल्य, वडिलांची माया ही सर्व प्रेमाची, स्नेहाची वेगवेगळी रूपे या विविध नात्यांतून अनुभवता येतात. मित्र-मैत्रिणींसोबतच्या नात्यातून जाणवणारी मैत्रीची, दोस्तीची भावना ज्याला अनुभवास येते, त्याचं आयुष्य एका निखळ आनंदाने भरून जाते. भाऊ-बहीण यांच्याबरोबरच्या नात्यातून स्नेह, कौतुक, आपलेपणा या भावना जाणवून येतात. गुरू-शिष्याच्या नात्यात आदरयुक्त प्रेमाचा अनुभव येतो. ही सर्व नाती डोळ्यांना दिसत नसली, तरी मनाला जाणवतात, अनुभवता येतात. प्रत्येक नात्यातून जाणवणारी भावनेची एक एक छटा आपल्या आयुष्यात रंग भरत जाते, त्यामुळे नातं ही संकल्पना एखाद्या अगणित पाकळ्या असलेल्या फुलाप्रमाणे बहुरंगी आहे.

***कृ.३.स्वमत**

**माणसाच्या जडणघडणीत असलेलं नात्याचं महत्त्व सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर:** माणूस जन्माला आल्यापासून अनेक नाती जोडत असतो. ही नाती त्याला संरक्षण आणि आधार देतात. या नात्यांचा, त्यामुळे जोडल्या जाणाऱ्या माणसांचा आपल्यावर प्रभाव पडतो. आपल्या कळत नकळत अवतीभवतीच्या माणसांमधील गुण, त्यांचे संस्कार आपण घेत असतो. याचे उत्तम व सर्वांना परिचित उदाहरण म्हणजे साने गुरुजी. आईने दिलेल्या संस्काराच्या शिदोरीवरच श्यामचा पुढे एक आदर्श शिक्षक व समाजसेवक होऊ शकला.

अगदी सामान्य माणूससुद्धा आई-वडील, मित्र इत्यादी नात्यांतून काही ना काही शिकतच असतो. गुरूकडून ज्ञान प्राप्त होते, तर आई-वडिलांकडून निरपेक्ष प्रेम करण्याची कला आपण शिकतो. त्यांच्या सहवासात त्यांचे गुण आपण शिकतोच; पण त्यांनी जागरूकपणे आपल्याला शिकवलेल्या अनेक गोष्टी आपल्याला आयुष्यभर, उपयोगी पडतात, चांगले व्यक्तिमत्त्व घडवण्यास मदतरूप ठरतात. अगदी उतारवयातही आजी-आजोबा आपल्या नातवंडांना संस्कारांची शिदोरी देतात, त्यामुळे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर नाती ही माणसाचे जीवन अनुभवसमृद्ध करत असतात.

## भाषाभ्यास

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

**कृ.१. अलंकार ओळखा.**

i. देह देवाचे मंदिर । आत आत्मा परमेश्वर ।।

ii. कुटुंबवत्सल इथे फणस हा। कटिखांद्यावर घेऊनि बाळे।
कथिते त्याला कुशल मुलांचे। गंगाजळिचे बेत आगळे।।

**उत्तर:** i. रूपक अलंकार
ii. चेतनगुणोक्ती अलंकार

**कृ.२. नावे लिहा.**

i. स्त्री-पुरुषांना एकमेकांविषयी वाटणारे आकर्षण, प्रेम, भेटीची तळमळ, विरह यांचे वर्णन करणारा रस –

ii. भयानक, भीतिदायक वर्णने, मृत्यू, भूतप्रेत, स्मशान, हत्या यांचे वर्णन करणारा रस –

iii. भक्तिभाव व शांत स्वरूपातील निसर्गाचे वर्णन करणारा रस –

**उत्तर:** i. शृंगार रस ii. भयानक रस
iii. शांत रस

**कृ.३. खालील शब्दांतील लेखननियमांनुसार अचूक शब्द लिहा.**

i. छिन्नि / छीन्नी / छिन्नी / छिण्नी

ii. हितचिंतक / हीतचिंतक / हीतचितंक / हीतचींतक

iii. अहंगड / अंहगड / अहगंड / अंहगंड

iv. परिस्थीती / परीस्थिती / परीस्थीती / परिस्थिती

**उत्तर:** i. छिन्नी ii. हितचिंतक
iii. अहंगड iv. परिस्थिती

Sample Content

## ब. भषिक घटकांवर आधारित कृती

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. मुलगी ii. सुंदर iii. भक्कम
iv. मुलायम v. गूढ vi. कणखर
vii. वात्सल्य viii. वेदना ix. मित्र
x. तारुण्य xi. वार्धक्य

**उत्तर:** i. कन्या ii. सुरेख iii. मजबूत
iv. मऊ v. रहस्य vi. मजबूत
vii. ममत्व viii. यातना ix. सखा
x. यौवन xi. म्हातारपण

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. स्वकीय × ii. जवळीक × iii. कठोर ×
iv. ठळक × v. खडतर × vi. मैत्री ×
vii. अभिनव × viii. सूक्ष्म × ix. शाश्वत ×
x. भिन्न × xi. निर्णायक ×

**उत्तर:** i. परकीय ii. दुरावा iii. मृदू
iv. पुसट v. सोपे vi. वैर, शत्रुत्व
vii. पुरातन viii. प्रचंड ix. अशाश्वत
x. अभिन्न xi. अनिर्णायक

**कृ.३. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

i. मित्र जरी समोर दिसला, तरी मैत्री कधी दिसत नसते.
ii. रोज नवी गोष्ट सांगणारी आजी, आता आठवणीतच जपावी लागते.

**उत्तर:** i. **मैत्रीण** जरी समोर **दिसली**, तरी मैत्री कधी दिसत नसते.
ii. रोज नवी गोष्ट **सांगणारे आजोबा**, आता आठवणीतच **जपावे लागतात.**

**कृ.४. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

i. हे मोती मग एक सुंदर वीण गुंफत जातात.
ii. त्या आठवणीसह हृदयात नाती जपली जातात.

**उत्तर:** i. **हा मोती** मग एक सुंदर वीण गुंफत **जातो**.
ii. त्या आठवणीसह हृदयात **नाते जपले जाते**.

**कृ.५. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

i. संपूर्ण विश्वाचा समावेश असणारे
ii. आपल्या हिताविषयी काळजी असणारा
iii. सहन करण्यास अशक्य असे

**उत्तर:** i. विश्वात्मक ii. हितचिंतक
iii. असह्य

**कृ.६. खालील शब्दांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

i. भवसागर ii. आठवण iii. वाटचाल

**उत्तर:** i. भगर, भर, वसा, वग, वर, साव, साग, सागर, सार, सावर, गर, रव, रसा, रग.
ii. आठ, आठव, आव, आण.
iii. वाट, वाचा, वाल, चावा, चाट, चाल, लट

**कृ.७. खालील शब्दांपैकी उपसर्गघटित व प्रत्ययघटित शब्द शोधून त्यांचे योग्य गटांत वर्गीकरण करा.**

प्रत्येक, स्वकीय, निकोप, निखळ, निर्विवाद, हितचिंतक, मार्गदर्शक, अभिन्न, अपुरं, अभिनव, अतिशय, कौटुंबिक, अनादि, अनंत, निर्णायक.

**उत्तर:**

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द |
|---|---|
| प्रत्येक, निकोप, निखळ, निर्विवाद, अभिन्न, अपुरं, अभिनव, अतिशय, अनादि, अनंत | स्वकीय, हितचिंतक, मार्गदर्शक, कौटुंबिक, निर्णायक |

**कृ.८. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**
**(आज्ञार्थी / विधानार्थी / प्रश्नार्थी / उद्गारार्थी / नकारार्थी)**

i. आनंदाचा मुखवटा धारण केलेल्या आई-वडिलांचं दुःख मुलांना कळणार कसं अन् कधी?
ii. नात्यांची वीण ही अशीच असते, घट्ट पकडून ठेवणारी!
iii. आईच्या डोळ्यांतून झरणाऱ्या अश्रूंची कथा साऱ्यांनाच माहिती आहे.
iv. मैत्री कधी दिसत नसते.

**उत्तर:** i. प्रश्नार्थी वाक्य ii. उद्गारार्थी वाक्य
iii. विधानार्थी वाक्य iv. नकारार्थी वाक्य

**कृ.९. खालील शब्दांच्या जाती ओळखा.**

i. अलगदपणे ii. आणि iii. धाग्यासारखी
iv. अगाई! v. प्रवास vi. निकोप
vii. पण viii. पलीकडे

**उत्तर:** i. क्रियाविशेषण अव्यय ii. उभयान्वयी अव्यय
iii. शब्दयोगी अव्यय iv. केवलप्रयोगी अव्यय
v. नाम vi. विशेषण
vii. उभयान्वयी अव्यय viii. क्रियाविशेषण अव्यय

**कृ.१०. खालील शब्दांच्या जाती ओळखून लिहा.**

माणूस, जातात, हा, तरल, बहुरंगी, उंबरठा, साधते, त्या

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| माणूस | हा | तरल | जातात |
| उंबरठा | त्या | बहुरंगी | साधते |

Sample Content

**कृ.११.खालील शब्दांसाठी पारिभाषिक शब्द लिहा.**

i. Academic Qualification ii. Casual Leave
iii. Lyric

**उत्तर:** i. शैक्षणिक अर्हता ii. नैमित्तिक रजा
iii. भावगीत

**कृ.१२.खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. अशी ही बहुरंगी वीण अलगदपणे नात्यांचे एक एक पदर आपल्यासमोर उलगडत जाते
ii. तेव्हाचं ते नातं अनादि अनंताचं नव्या अभिनव सृजनाचं होतं हे मात्र निर्विवाद सत्य
iii. याला शब्दांचं क्षितिजच काय पण शब्दांचं आभाळही अपुरं पडेल
iv. मैत्री हे एक असंच नातं आहे

**उत्तर:** i. अशी ही बहुरंगी वीण अलगदपणे नात्यांचे एक-एक पदर आपल्यासमोर उलगडत जाते.
ii. तेव्हाचं ते नातं 'अनादि अनंताचं, नव्या अभिनव सृजनाचं' होतं हे मात्र निर्विवाद सत्य !
iii. याला शब्दांचं क्षितिजच काय; पण शब्दांचं आभाळही अपुरं पडेल.
iv. 'मैत्री' हे एक असंच नातं आहे.

**कृ.१३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. हुरहुर लागणे ii. जीवाची उलघाल होणे
iii. तारेवरची कसरत करणे iv. कानमंत्र देणे
v. मात करणे vi. पोरके होणे
vii. कात टाकणे viii. पाठीशी उभे राहणे
ix. आनंदाचा मुखवटा धारण करणे

**उत्तर:**

**i. हुरहुर लागणे** – जीवाला चुटपुट लागणे.
**वाक्य:** मुलगा रात्री उशिरापर्यंत घरी न आल्याने वासंतीबाईंच्या मनाला **हुरहुर लागली.**

**ii. जीवाची उलघाल होणे** – काळजीने अस्वस्थ होणे.
**वाक्य:** आपल्या गावात पूर आल्याचे समजल्यावर समीरच्या **जीवाची उलघाल होऊ लागली.**

**iii. तारेवरची कसरत करणे** – अतिशय अवघड काम करताना तारांबळ उडणे.
**वाक्य:** घर आणि नोकरी सांभाळताना स्त्रीला **तारेवरची कसरत करावी लागते.**

**iv. कानमंत्र देणे** – महत्त्वपूर्ण ज्ञान देणे, गुप्त सल्ला देणे.
**वाक्य:** वडिलांनी सतीशला लहानपणीच उद्योग चालवण्याविषयीचा **कानमंत्र दिला.**

**v. मात करणे** – पराभूत करणे.
**वाक्य:** असंख्य अडचणींवर **मात करत** शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली.

**vi. पोरके होणे** – अनाथ होणे.
**वाक्य:** लहान वयातच आई-वडिलांचे छत्र हरपल्याने मधू **पोरका झाला.**

**vii. कात टाकणे** – जुन्या/वाईट गोष्टींचा त्याग करून नवीन स्वरूप धारण करणे.
**वाक्य:** त्या खेडेगावाने **कात टाकल्यामुळे**, त्याचे रूपांतर आज एका प्रसिद्ध शहरात झाले आहे.

**viii. पाठीशी उभे राहणे** – पाठिंबा देणे, सहकार्य करणे.
**वाक्य:** कोणत्याही अडीअडचणीत लीनाचे आईवडील कायम तिच्या **पाठीशी उभे राहतात.**

**ix. आनंदाचा मुखवटा धारण करणे** – आनंदी आहोत असे भासवणे.
**वाक्य:** मनात दु:ख असणारे कित्येक लोक **आनंदाचा मुखवटा धारण करून** जगत असतात.

**कृ.१४.वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या जुळवा.**

| क्र. | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | उंबरठा ओलांडणे | अ. | नवी सुरुवात होणे |
| ii. | नवी पालवी फुटणे | ब. | मृत्यू होणे |
| iii. | पिकलं पान गळणे | क. | मर्यादा ओलांडणे |
| | | ड. | गुप्त सल्ला देणे |

**उत्तर:** (i – क), (ii – अ), (iii – ब)

## भाषासौंदर्य

***कृ.१. पाठात परस्परविरोधी शब्द वापरून काही वाक्यांची रचना केली आहे.**
**उदा. कधी आई आपल्यासाठी <u>उबदार</u> शाल असते, तर कधी <u>कणखर</u> ढाल असते. अशा प्रकारची वाक्ये स्वत: तयार करा.**

**उत्तर:** i. **दु:खाच्या** काळ्याकुट्ट **रात्रीतून सौख्याची** सोनेरी **पहाट** उजाडते.
ii. त्या **लहानशा** झोपडीत राहणाऱ्या माणसांची मनं मात्र प्रासादासारखी **विशाल** होती.
iii. अवयवदानाच्या संकल्पातून एक **विझता** दिवा दुसऱ्या दिव्याला **प्रकाशमान** करू शकतो.

**(टीप:** विद्यार्थी अशा प्रकारची अधिक वाक्ये स्वत: तयार करू शकतील.)

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. IX

**Eng. Med.**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

**Mar. Med.**
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

# AVAILABLE NOTES FOR STD. X

**Eng. Med.**
PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Eng. Med.**
PRECISE SERIES
- History, Political Science and Geography
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Additional Titles:**
(Eng. & Mar. Med.)

Grammar & Writing Skills Books (Std. IX & X)
- Marathi
- Hindi
- English

- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book

**Mar. Med.**
PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

**OUR PRODUCT RANGE**

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Statponery

Visit Our Website




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:** 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15 • **Website:** www.targetpublications.org • **Email:** mail@targetpublications.org